सकाळ

# कमला कॉलेजमध्ये कार्यशाळा

**कोल्हापूर :** कमला महाविद्यालयाच्या क्रांतिवीर रंगरावदादा पाटील ग्रंथालय आणि माजी विद्यार्थिनी संघतर्फे 'इफेक्टिव्ह इन्फॉर्मेशन सर्चिंग' यावर कार्यशाळा झाली. भोगावती महाविद्यालयातील ग्रंथपाल प्रा. प्रशांत कल्लोळी यांनी ऑनलाईन टिचिंग, लर्निंग, सोशल मीडिया'चा अभ्यासासाठी वापर, विपुल प्रमाणात उपलब्ध ऑनलाईन स्टडी मटेरियल, ईपीजी पाठशाळा, गुगल ट्रान्सलेटर, गुगल अॅलर्ट, हिस्टॉरिकल अर्काईव्ह या संशोधनासाठी उपयुक्त साईटस्‌ची माहिती सांगितली. प्राचार्या डॉ. तेजस्विनी मुडेकर अध्यक्षस्थानी होत्या. माजी विद्यार्थिनी संघाच्या समन्वयक प्रा. डॉ. निता धुमाळ यांनी माजी विद्यार्थिनी संघ स्थापन करण्यामागील संस्थेचा उद्देश स्पष्ट केला. ग्रंथपाल प्रा. ऊर्मिला कदम यांनी परिचय केला. संयोजन प्रा. डॉ. छाया माळी, पूजा चव्हाण, प्रा. पूजा खोपकर यांनी केले. श्रीमती मनीषा कदम यांनी सूत्रसंचालन केले. माजी विद्यार्थिनी संघाच्या उपाध्यक्षा राजनंदा देशमुख आदी उपस्थित होत्या.

Kolhapur, Main
09/05/2022 Page No. 7